३) **लबाडी:** वस्तु, सेवा किंवा कामे प्राप्त करण्याच्या किंवा करार करण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी, खरेदीदाराला किंवा अन्य सहभागीदारांना हानी पोहचेल अशा रीतीने माहितीचा किंवा वास्तवाचा गैरवापर करुन प्रभाव टाकणे;

४) **संगनमत:** स्पर्धात्मक नसलेल्या व कृत्रिमपणे ठरविलेल्या किंमतीच्या निविदा करण्यासाठी निविदाकारांमध्ये करण्यात येणारा करार.

### २.७ खरेदीचे नीतिशास्त्र

नीतिशास्त्र हे बरोबर आणि चूक, नैतिक कर्तव्य आणि जबाबदारी, नैतिक तत्त्वे आणि मूल्य व नैतिक चारित्र्य यांच्या शिस्तीशी संबंधित असते. सचोटी, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यासारख्या तत्त्वांशी संबंधित बहुतेक खरेदी या नीतिशास्त्रावर आधारित असते.

शासकीय/अर्ध-शासकीय कार्यालयांच्या कामकाजातील भ्रष्टाचार आणि लबाडीमुळे निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उद्देशित निधी कमी पडतो. लबाडीचा परिणाम बहुविध असल्यामुळे कमी उत्पन्न गटातील व्यक्तींसाठी राखून ठेवलेल्या निधीच्या बेकायदेशीर हस्तांतरण आणि गैरवापरामुळे देशाच्या एकूण ठोस उत्पादनावर विपरित परिणाम होतो.

खरेदीशी संबंधित सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कार्यालयामधील किंवा बाहेरील सर्व व्यावसायिक संबंधांमध्ये प्रामाणिकपणाचा संशयातीत दर्जा राखावा. नीतिशास्त्रातील नियम खरेदीदार, ग्राहकवर्ग, देणगीदार, शासन, भागीदार आणि सर्वसाधारण जनता यांच्यातील सर्व व्यवहारांना लागू राहतील. खरेदीशी संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी त्यांच्या अधिकाराचा किंवा कार्यालयाचा वापर वैयक्तिक फायद्यासाठी कधीही करणार नाहीत आणि ते खरेदीदाराची प्रतिष्ठा कायम ठेवण्याचा आणि वाढविण्याचा सतत प्रयत्न करतील.

खरेदीची कामे करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचा वर्तणुकीच्या दर्जामध्ये खालील बाबींचा, परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादीत न रहाता, समावेश असेल:-

१) असे अधिकारी/कर्मचारी विशिष्ट खरेदीशी संबंधित माहिती कोणत्याही पुरवठादाराला, अशी माहिती व्यापक व्यावसायिक वर्गाला उपलब्ध करुन देण्यापूर्वी, मिळू देणार नाहीत;

२) असे अधिकारी/कर्मचारी हेतुपूर्वक मर्यादित किंवा " तयार केलेली " तपशीलवार वैशिष्टे, कार्य-कक्षा यांचा अनावश्यक वापर स्पर्धेला बाधक ठरेल अशा रीतीने करणार नाहीत;

३) असे अधिकारी/कर्मचारी जी व्यक्ती खरेदीदाराच्या व्यवसाय घेण्याचा प्रयत्न करीत असेल किंवा केला असेल अशा व्यक्तीने भावी चांगल्या नोकरी संबंधी दिलेले आश्वासन, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, मागणार नाहीत किंवा स्वीकारणार नाहीत;

४) अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे, खरेदीदाराच्या निविदा आमंत्रणाला प्रतिसाद देणाऱ्या कोणत्याही पुरवठादाराशी आर्थिक हितसंबंध नसतील किंवा असे हितसंबंध असल्यास, त्यांना खरेदीच्या कार्यवाहीत भाग घेऊ दिला जाणार नाही;

५) असे अधिकारी/कर्मचारी मालकीच्या संबंधात आणि स्त्रोत निवडीबाबतची माहिती, अशी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीशिवाय अन्य व्यक्तीकडे, उघड करणार नाहीत.

## २.८ नियमपुस्तिकेतील तरतुदींचे पुनर्विलोकन

नियमपुस्तिकेतील तरतुदींचे पुनर्विलोकन करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षेतेखालील पुनर्विलोकन उच्चाधिकार समिती खाली नमुद केल्याप्रमाणे असेल. सदर

समिती आवश्यकता असल्यास, नियमपुस्तिकेची व्याप्ती आणि स्वरुप यांचे वेळोवेळी पुनर्विलोकन आणि सुधारणा करेल:-

| | | |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (उद्योग) | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव (नियोजन) | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव (ग्राविवि) | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव /सचिव (माहिती तंत्रज्ञान) | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव/सचिव (सार्वजनिक आरोग्य) | सदस्य |
| ८ | प्रधान सचिव /सचिव (महिला व बाल-विकास) | सदस्य |
| ९ | विकास आयुक्त (उद्योग) | सदस्य-सचिव |
| १० | अन्य विभागांतील निमंत्रित | निमंत्रित |

## २.९ विविध समित्यांची रचना व अधिकार

### २.९.१ खरेदीसाठीची उच्चाधिकार समिती

या नियमपुस्तिकेत तातडीची खरेदी, मर्यादित निविदा/निर्बंधित निविदा, स्विस चॅलेंज, इत्यादी पध्दतीच्या खरेदीसाठी एक उच्चस्तरीय खरेदी समिती नेमण्यात आली आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील:

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव | अध्यक्ष |
| २ | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| ३ | विकास आयुक्त (उद्योग) | सदस्य |

या उच्चाधिकार समितीला रुपये एक कोटी वरील तातडीची खरेदी, मर्यादित निविदा/ निर्बंधित निविदा, स्विस चॅलेंज अन्वये खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. या समितीने खरेदी करण्यास मान्यता दिल्यानंतर संबंधित विभागाने प्रशासकीय मान्यता दयावी व वित्तीय अधिकार मर्यादेमध्ये उचित स्तरावर खरेदी प्रक्रिया राबवावी.

### २.९.२ राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती

या नियमपुस्तिकेत घालून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार खरेदी प्रक्रिया हाती घेण्यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभाग/कार्यालय अंतर्गत खरेदी समिती (डीपीसी/पीसी) गठीत करील. गठीत केलेल्या खरेदी समितीचा प्रत्येक सदस्य हा भारतीय दंड संहितेच्या परिच्छेद २१ अंतर्गत एक लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. प्रशासकीय विभाग खरेदी समितीची रचना विभाग प्रमुख निश्चित करतील आणि ते खालील रचनेचे अनुकरण करतील:-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय विभाग प्रमुख | अध्यक्ष |
| २ | संबंधित खरेदीदार विभाग/कार्यालयाचा खरेदी प्रक्रिया हाताळणारा गट-अ दर्जापेक्षा कमी नसलेला ज्येष्ठ अधिकारी | सदस्य सचिव |
| ३ | उप-सचिव दर्जाच्या कमी नसलेला प्रशासकीय विभागाचा प्रतिनीधी | सदस्य |
| ४ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट-ब दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ५ | उद्योग सह संचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनीधी/ | निमंत्रित |
| ६ | अन्य विभागांकडून कोणताही निमंत्रित, आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ७ | तांत्रिक तज्ज्ञ, आवश्यकता असल्यास | निमंत्रित |

या शिवाय एखादया यंत्र सामग्रीची / उपकरणाची खरेदी करण्याचे ठरल्यानंतर विभागाची गरज लक्षात घेऊन त्या अनुषंगाने नि:पक्षपातीपणे तांत्रिक विर्निदेश (Technical Specification) ठरविण्यासाठी संबंधित खरेदीदार विभागास तांत्रिक समिती गठित करावयाची असल्यास त्या विभागाने स्वतंत्र तांत्रिक समितीची रचना व कार्यपध्दती निश्चित करावी.

या नियमपुस्तिकेत विहित केलेल्या खरेदी कार्यपद्धतीचा अवलंब करुन खरेदी करावयाच्या बाबीसंबंधात सर्व निर्णय समितीला घेता येईल. जर खरेदीचे अंदाजित मूल्य रुपये दहा लाखापेक्षा (रु. १० लाख) कमी असेल तर, विभाग प्रमुखाला खरेदी संबंधी प्रशासकीय विभागीय खरेदी समितीची बैठक न बोलविता निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

याबाबतीत कोणतीही तफावत असल्यास, विकास आयुक्त (उद्योग) यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असेल. निविदा सुचना तयार करणे, तपशिलवार वैशिष्टयांना अंतिम स्वरुप देणे, तांत्रिक निविदा उघडणे व छाननी करणे इ. प्रक्रिया संबंधित खरेदीदार कार्यालयांनी

आपल्या स्तरावर पार पाडण्याची कार्यवाही करावी. खरेदी समिती खरेदी प्रक्रियेच्या अंतिम टप्यासाठी कार्यरत राहील.

**२.९.३ मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) खरेदी समिती**

मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) यांना लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी संबंधित विभागाचे सह/उपसचिव यांच्या अध्यक्षतेखाली खरेदी समिती गठित करण्यात यावी. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित विभागाचे सह सचिव/ उपसचिव | अध्यक्ष |
| २ | उद्योग संचालनालयाचे प्रतिनिधी | निमंत्रित |
| ३ | लेखा व कोषागरे संचालनालयाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | सबंधित खरेदीदार विभागाचा खरेदी अधिकारी | सदस्य सचिव |

**२.९.४ स्थानिक खरेदी समिती**

स्थानिक स्तरावर (विभागीय/जिल्हा स्तरावरील क्षेत्रीय कार्यालय) खरेदी प्रक्रिया राबविण्यासाठी खरेदीदार विभागाने समिती स्थापन करावी. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

**अ. विभागीय स्तरावर खरेदी समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुख | अध्यक्ष |
| २ | उद्योग सह संचालक (विभागीय कार्यालय) / प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | विभागीय अधिकारी (लेखा व कोषागरे विभाग)/ प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संबंधित खरेदीदार विभागाचा खरेदी अधिकारी | सदस्य सचिव |

**ब. जिल्हास्तरावर खरेदी समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित खरेदीदार विभागाचा जिल्हा कार्यालय प्रमुख | अध्यक्ष |
| २ | महाव्यवस्थापक (जिल्हा उद्योग केंद्र) / प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | लेखा व कोषागरे या कार्यालयाचा गट-अ/गट-ब दर्जाचा अधिकारी/प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संबंधित खरेदीदार विभागाचा खरेदी अधिकारी | सदस्य सचिव |

प्रादेशिक स्तरावर, जिल्हा स्तरावर, कार्यालय स्तरावर त्या त्या कार्यालयामधील महाराष्ट्र लेखा व वित्त सेवेचे गट-अ व गट-ब अधिकारी कार्यरत असून

त्यांचा समितीमध्ये समावेश करावा. तथापि, या कार्यालयामध्ये/विभागामध्ये असे अधिकारी कार्यरत नसतील तर खरेदी समितीवर संचालनालयामार्फत तसेच प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागरे यांचेमार्फत पाठविण्यात आलेला गट-अ/ब चा प्रतिनिधी यांचा समितीमध्ये समावेश करण्यात यावा. तसेच जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट-ब दर्जाच्या लेखाधिकाऱ्याला जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने समितीवर प्रतिनिधी म्हणून घेता येईल.

सदर समित्यांना संबंधित प्रशासकीय विभाग प्रमुखांनी खरेदीच्या वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान करावेत. याबाबतची प्रक्रिया खरेदी धोरण लागू झाल्यापासून १ महिन्यांच्या आत पूर्ण करावी.

वरील सर्व समित्यांनी त्यांचे वित्तीय अधिकाराच्या मर्यादेत खरेदी प्रक्रिया राबवावी. दरपत्रकाच्या आधारे होणारी ३ लाखापर्यंतची खरेदीस उपरोक्त समित्यांची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

या नियमपुस्तिकेत विहित केलेली खरेदीची कार्यपध्दती अवलंबून त्यांना खरेदी करावयाच्या बाबीसंबंधात विभागीय खरेदी समिती (डीपीसी) सर्व निर्णय घेईल. या बाबतीत कोणतीही तफावत असल्यास, त्यासाठी विकास आयुक्त (उद्योग) यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असेल. निविदा सुचना तयार करणे, तपशिलवार वैशिष्टयांना अंतिम स्वरुप देणे, तांत्रिक निविदा उघडणे व छाननी करणे इ. प्रक्रिया संबंधित खरेदीदार कार्यालयांनी आपल्या स्तरावर पार पाडण्याची कार्यवाही करावी. खरेदी समिती खरेदी प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यासाठी कार्यरत राहील.

## २.१० खरेदी अधिकारी

प्रत्येक विभाग/कार्यालय पुरवठादाराबरोबर विभागाच्या/ कार्यालयाच्या वतीने करार करण्यासाठी पदनिर्देशित करावयाचे एक किंवा अनेक अधिकारी निश्चित करतील. खरेदी अधिकारी हा गट-ब पेक्षा कमी दर्जाचा अधिकारी नसेल व तो खरेदी समितीचा सदस्य सचिव असणे आवश्यक आहे.

खरेदी अधिकाऱ्याने आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडताना अतिशय काळजी, कार्यक्षमता, नि:पक्षपातीपणा आणि प्रामाणिकपणा दाखविणे अपेक्षित आहे. कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी, खरेदी अधिकारी खालील बाबींची काळजी घेईल:-

१) या नियमपुस्तिकेत विहित करण्यात आलेल्या सर्व खरेदी कार्यपध्दती व तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करील.
२) खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असेल.
३) खरेदीचे कार्य संबंधित संस्थेच्या हिताच्या दृष्टिने सर्वात चांगले असेल.

खरेदी प्रक्रियेचे संनियंत्रण करण्यासाठी ठरविलेल्या आवश्यकतेनुसार पार पाडण्यात आलेल्या सर्व कार्यांचा अहवाल देण्यात येईल.

### २.११ मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेची (C.S.P.O.) ची कार्ये

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेची कार्यकक्षा आता मर्यादीत करण्यात आली आहे. यापुढे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेद्वारे केवळ अंध व अपंग यांच्या संस्थांची व महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ (महाटेक्स) यांची दरनिश्चिती, दोन किंवा अधिक प्रशासकीय विभागाला लागणाऱ्या आवश्यक वस्तूंची खरेदी करणे व शासकीय खरेदीच्या संदर्भात धोरण आखणी करण्याची एकूण जबाबदारी ठेवण्यात येत आहे. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचना सर्व खरेदी अधिकाऱ्यांना बंधनकारक राहतील.

दरनिश्चिती करण्यात येणाऱ्या संस्थांसाठी राखीव असलेल्या वस्तूंची उत्पादन क्षमता दर दोन वर्षांनी मध्यवर्ती भांडार समितीकडून तपासण्यात येईल. जेथे पुरवठादार एक वेळ एकल मागणी पत्रकावर टप्पा पध्दतीने सवलत देत असतील तर, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना तसेच संबंधित विभाग या टप्पा सवलतीचा लाभ घेऊ शकतील आणि या प्रयोजनासाठी संबंधित विभाग आवश्यक माहिती मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेला सादर करतील व या माहितीचे संकलन केल्यानंतर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना ही बाब टप्पा सवलत घेण्यासाठी पुरवठादारांबरोबर चर्चेकरिता घेईल.

अशा संस्थाकडून खरेदी केलेल्या राखीव वस्तूंची माहिती वेळोवेळी खरेदी पोर्टलवर संबंधित खरेदी करणारे शासकीय विभाग /कार्यालय अद्ययावत करतील. तसेच संबंधीत शासकीय संस्था दर तिमाही त्यांच्याकडून विविध शासकीय विभागांनी/कार्यालयांनी खरेदी केलेल्या वस्तुंची संख्या पोर्टलवर अद्ययावत करतील. याद्वारे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस संस्थांनी उत्पादन क्षमतेच्या मर्यादेत पुरवठा केल्याचे तपासता येईल.

### २.१२ एक/दोन पेक्षा अधिक विभागांकडून करावयाची खरेदी

#### अ) एका पेक्षा अधिक विभागांकडून करावयाची खरेदी

ज्या वस्तू एका पेक्षा अधिक विभागांना खरेदी करणे आवश्यक असेल त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी विचारविनिमय करुन एका संयुक्त समितीमार्फत दरकरारावर खरेदीची व्यवस्था करावी.

किंवा

#### ब) दोन पेक्षा अधिक विभागांकडून करावयाची खरेदी

ज्या वस्तू दोन किंवा अधिक प्रशासकीय विभागाला खरेदी करणे आवश्यक असेल त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडे (CSPO) मागणी करावी. अशी मागणी करतांना प्रशासकीय विभागाने वस्तूंचे विर्निदेश (Specification),

प्रमाण/संख्या (Quantum), वस्तूंची एकूण अंदाजित किंमत, वस्तूंचा पुरवठा करण्याचे स्थळ व पुरवठा करण्यासाठी कालमर्यादा इत्यादी बाबी नमुद करुन खरेदीस प्रशासकीय मान्यता व वित्तीय तरतूद असल्याची कागदपत्रे सोबत जोडून विहित नमुन्यात मागणीपत्र सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने सादर करावे. असे मागणीपत्र प्राप्त झाल्यानंतर आवश्यक वस्तूंची खरेदीसाठीची प्रक्रिया मध्यवर्ती भांडार खरेदी समितीकडून करण्यात येईल व तदनंतरची प्रत्यक्षात खरेदीबाबतची कार्यवाही त्या- त्या संबंधित विभागामार्फत करण्यात येईल. त्यासाठी मध्यवर्ती भांडार खरेदी समिती पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | उप सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | अध्यक्ष |
| २ | उप सचिव (वित्त विभाग),मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३ | उद्योग सह संचालक (भांडार खरेदी), उद्योग संचालनालय | सदस्य सचिव |
| ४ | उपसचिव दर्जाच्या कमी नसलेला संबंधित खरेदीदार प्रशासकीय विभागाचा अधिकारी | निमंत्रित |

**२.१२.१ मध्यवर्ती भांडार खरेदी समिती - मुद्रण व लेखन सामग्री**

शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संस्थेकरिता लागणाऱ्या एक किंवा अनेक वस्तुंची खरेदी करण्यासाठी नियमपुस्तिकेच्या २.९.४ (अ) मध्ये नमुद केल्यानुसार विभागीय स्तरावरील मध्यवर्ती भांडार खरेदी समिती संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री यांच्या अध्यक्षतेखाली गठित करावी. यापूर्वी शासकीय मुद्रणालयाच्या आधुनिकीकरणासाठी नवीन यंत्रसामग्री खरेदी करण्याकरीता शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.मुलेसा-२००७/प्र.क्र.२२१/उद्योग-४,दिनांक ३१.०१.२००९ अन्वये विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेली समिती रद्द करण्यात येत आहे.

शासन निर्णय दि.२.१.१९९२ परिशिष्ट (२) मध्ये शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालयाकडून खरेदी करण्यासाठी वस्तू राखून ठेवण्यात आल्या होत्या. तथापि, सदरच्या धोरणामध्ये या वस्तू राखून ठेवण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर वस्तूसाठी लेखन सामग्री संचालनालयास खरेदीची मर्यादा निश्चित केलेली नाही. परंतू, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालयास एक किंवा अनेक वस्तूंची रुपये दहा लाखांपेक्षा (रु. १० लाख) कमी असलेली एकूण वार्षिक खरेदी शासकीय मुद्रण व लेखन-सामग्री संचालनालयाच्या ‘कार्यालयीन समिती’ मार्फत करता येईल. त्यापेक्षा जास्त खरेदीसाठी या नियमपुस्तिकेत विहित केलेली खरेदीची कार्यपध्दती अवलंबून त्यांना खरेदी करावयाच्या बाबीसंबंधात संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय यांच्या अध्यक्षतेखालील ‘विभागीय स्तरावरील मध्यवर्ती भांडार खरेदी समिती’ सर्व निर्णय घेईल.

**२.१२.२ मध्यवर्ती भांडार खरेदी समिती- सार्वत्रिक निवडणूकांसाठी**

सार्वत्रिक निवडणुकांसाठी सामग्री खरेदी, महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणुक अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राने “तातडीची खरेदी पध्दती” चा अवलंब करुन करण्यात येईल. (नियमपुस्तिकेतील

परिच्छेद ३.३.१ पहावा) या प्रयोजनासाठी खालील मध्यवर्ती भांडार खरेदी समिती गठित करण्यात येईल:-

| | | |
|---|---|---|
| १ | उप सचिव, साप्रवि/उप मुख्य निवडणूक अधिकारी | अध्यक्ष |
| २ | सह/उप सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ३ | वरीष्ठ लेखाधिकारी, सामान्य प्रशासन विभाग/लेखा व कोषागारे संचालनालय | सदस्य |
| ४ | उद्योग सह संचालक (भांडार खरेदी),उद्योग संचालनालय | सदस्य |
| ५ | निवडणुक कार्यालयातील वर्ग-१ अधिकारी/साप्रवि | सदस्य |
| ६ | संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

## २.१३ प्रशासकीय मान्यता

खरेदीदार प्रशासकीय विभागांनी/कार्यालयांनी कोणतीही खरेदी करण्यापुर्वी प्रशासकीय आदेश काढल्यानंतरच खरेदी प्रक्रिया अबलंबविण्यात यावी. तसेच प्रशासकीय आदेशातच खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तूंचा विनियोग तातडीने केला जाणार आहे, असे प्रमाणित करण्यात यावे.

प्रत्येक प्रशासकीय विभाग/कार्यालय प्रमुखांनी त्यांना असलेल्या वित्तिय मर्यादेपर्यंत प्रशासकीय मान्यता दयावी, अशा प्रकारची प्रशासकीय मान्यता ही वित्तिय नियमावलीनुसार असावी. तसेच तातडीची खरेदी, मर्यादित खरेदी व स्विस चलेंज पध्दतीने करावयाच्या खरेदीसाठीही प्रशासकीय मान्यता आवश्यक राहील. खरेदीदार प्रशासकीय विभागाने / कार्यालयाने कोणतीही खरेदी करण्यापूर्वी आर्थिक तरतूद उपलब्ध असल्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांनी खरेदीचा निर्णय घेतल्यानंतर प्रशासकीय मान्यता एक महिन्याच्या आत देणे बंधनकारक राहील.

जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका/परिषद, विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था/मंडळ/महामंडळ/प्राधिकरण/स्वायत्त संस्था इ. प्राधिकरणे त्यांच्या कायदयातील तरतुदीप्रमाणे प्रशासकीय निर्णय घेण्यास सक्षम राहतील.

वित्त विभागाकडून कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या देयकांच्या रकमा १५ मार्च नंतर मंजूर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तूंच्या खरेदीची निविदा वित्तीय वर्षाच्या १५ फेब्रुवारी पूर्वी प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. तथापि, सदर खरेदी ही तातडीची खरेदीची बाब म्हणून लागू करता येणार नाही. सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश मान्यतेच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंतच ग्राहय राहतील. एक वर्षाच्या कालावधीनंतर प्रशासकीय मान्यतेचे नविन आदेश काढण्यात यावेत.

## प्रकरण क्रमांक ३

## खरेदी प्रक्रिया

३.१ आवश्यकतांची व्याख्या

३.२ खरेदीचे प्रकार

३.३ विशेष परिस्थितीतील खरेदी

३.४ खरेदीच्या विशेष पद्धती

## ३. खरेदी प्रक्रिया

कोणत्याही कार्यालयातील खरेदीच्या प्रक्रियेस नियोजनाने सुरुवात होते आणि शेवट संबंधित वस्तु किंवा सेवेचा वापर करुन होतो. प्रस्तुत खरेदी नियमपुस्तिकेची व्याप्ती विचारात घेऊन खरेदी प्रक्रियेच्या उपयोगिता कालावधीच्या चक्राचे दोन संभाव्य भाग - विभागीय खरेदी प्रक्रिया आणि मध्यवर्ती खरेदी खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत:-




वर दिलेल्या खरेदी प्रक्रियेच्या उपयोगिता कालावधीच्या चक्रातील प्रत्येक टप्प्यासाठी मार्गदर्शक सूचना खालील भागात देण्यात आल्या आहेत:-

### ३.१ "आवश्यकता" ची व्याख्या

"आवश्यकता" म्हणजे खरेदी करावयाची वस्तू/उत्पादने आणि सेवांकडून भागविली जाणारी गरज. गरजांची स्पष्टपणे व्याख्या करणे हा आवश्यकतांची व्याख्या करण्याचा एक पध्दतशीर मार्ग आहे. खरेदी प्रक्रियेच्या अंमलबजावणीसाठी "आवश्यकता" ची व्याख्या करणे

ही पहिली पायरी आहे. अंतिम स्वरुप दिलेल्या आवश्यकता, खरेदीदाराच्या खरेदी धोरणाची पूर्तता करणाऱ्या असतील तसेच आवश्यकतांची तपशीलवार वैशिष्टे ठरविण्यासाठी ती एक चांगली प्रथा राहील, याची खात्री करण्याची जबाबदारी खरेदी कार्यालयाची असेल.

बाजारपेठेत करण्यात आलेल्या संशोधनाच्या माहितीचा प्रभाव आवश्यकतांच्या व्याख्येवर पडावा म्हणून अनेकदा आवश्यकतांची व्याख्या, स्त्रोतांचा शोध आणि बाजारपेठेतील संशोधनास समांतर म्हणून करण्यात येते. आवश्यकतांची व्याख्या आणि बाजारपेठेत करण्यात आलेल्या संशोधनाची कामे ही निविदा-पूर्व / खरेदी-पूर्व कार्ये म्हणून ओळखली जातात.

### ३.१.१ सुनिश्चित आवश्यकतेची वैशिष्ट्ये

आवश्यकतांची व्याख्या करण्यासाठी खरेदी करावयाच्या उत्पादनाचे (वस्तु) आणि त्याच्या कार्यांचे, कामगिरीच्या आवश्यकतांचे, वैशिष्टयांचे, उद्दिष्टांचे आणि/किंवा अंदाजित उत्पादनाचे (उत्पादनाच्या स्वरुपावर अवलंबून) विश्लेषण करणे आवश्यक आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांची माहिती गोळा करण्यात यावी आणि तिचा विचार करण्यात यावा.

सर्व आवश्यकतांच्या व्याख्यांमध्ये जास्त तपशीलवार वर्णन न देता नेमकी गरज विनिर्दिष्ट केली पाहिजे. जास्त तपशीलवार वर्णन नमूद केल्यास त्यामुळे किंमतीत वाढ होईल आणि/किंवा देकारांची संख्या कमी होईल, कारण त्यामुळे गरज असलेल्या उत्पादनांपेक्षा अधिक प्रगत उत्पादनांसाठी देकार पाठविले जाऊ शकतात. याउलट कमी तपशीलवार वर्णन दिल्यास त्यामुळे व्याख्या केलेल्या गरजा न भागवू शकणाऱ्या उत्पादनांसाठी देकार पाठविण्यात येतील. यामुळे, निधीचा परिणामकारक वापर व्हावा म्हणून आवश्यकतांमध्ये नेमक्या गरजेची व्याख्या करणे अतिशय महत्वाचे असते.

आवश्यकता व्यापक असाव्यात आणि त्यांची व्याख्या स्पर्धा निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली असावी. त्यामुळे कोणताही विशिष्ट ब्रॅन्ड (प्रमाणिकरणाच्या प्रयोजनासाठी नसल्यास) किंवा अन्य अनावश्यक मर्यादा घालण्यात येऊ नयेत. तथापि, जर ब्रॅन्डच्या नावाचा उपयोग कार्यात्मक/कामगिरी आणि/अनुरुपतेच्या आवश्यकता यांची व्याख्या करण्यासाठी केला असेल तर त्यांचा उपयोग फक्त आवश्यक उत्पादनांच्या मानकांची व्याख्या करण्यासाठी करण्यात आला पाहिजे. त्याशिवाय, दिलेली तपशीलवार वैशिष्ट्ये ही आपण ज्यांना अत्यावश्यक किमान आवश्यकता मानतो त्यांच्यापुरतीच मर्यादीत असावीत. शेवटी, तपशीलवार वैशिष्ट्यांमुळे उत्पादनांच्या सममूल्य असणारी उत्पादने, जी त्याच कार्यात्मक,

कामगिरी आणि/किंवा तांत्रिक मानकांची पूर्तता करणारी असतील, अशा उत्पादनांसाठी देकार आमंत्रित करण्यात यावेत

### ३.१.१.१ आय एस आय चिन्हांकित (MARK) असलेली उत्पादने

शासकीय कार्यालयांनी खरेदी प्रक्रियेत आय एस आय मार्कचा शिक्का असलेली उत्पादने खरेदी करण्याची काळजी घ्यावी. तसेच वस्तू खरेदी करण्यापूर्वी, सदरची वस्तू आयएसआय मार्क चिन्हांकित आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी भारतीय मानक ब्युरो (BIS) या कार्यालयाचे संकेतस्थळावरुन माहिती प्राप्त करावी.

१. प्रत्येकवेळी निविदेमध्ये सहभागी होणारे सर्व उत्पादक आयएसआय मार्क उत्पादक असतील अशी शक्यता नसल्याने, निविदा ही आयएसआय मार्क व आयएसआय मार्कशी समांतर दर्जाधारक उत्पादकाकडून मागविण्यात यावी.

२. अशाप्रकारे निविदा मागविल्यानंतर साधारण खालील परिस्थिती उद्भवू शकतात.
   - अ) तीन किंवा तीनपेक्षा जास्त आयएसआय मार्क उत्पादक सहभाग घेऊ शकतात.
   - ब) केवळ एक किंवा दोन आयएसआय मार्क उत्पादक सहभाग घेऊ शकतात.
   - क) एकही आयएसआय मार्क उत्पादकाने सहभाग घेतला नाही.

३. जर निविदेमध्ये ३ किंवा त्यापेक्षा जास्त आयएसआय मार्क उत्पादकांनी आणि १ किंवा त्यापेक्षा जास्त आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या उत्पादकांनी सहभाग घेतल्यास ;
   - अ) आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या वस्तूंची किंमत ही आयएसआय मार्क वस्तूंच्या किंमतीपेक्षा १० टक्के पेक्षा जास्तीने (more than १०%) कमी असेल, तेव्हा ८० टक्के आदेश आयएसआय मार्क निम्नतम दरधारक उत्पादकांस (L-१ of ISI) व २० टक्के आदेश आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेला निम्नतम दरधारक उत्पादकांस (L-१ of confirming to ISI) प्रायोगिक तत्त्वावर देण्यात यावेत.
   - ब) आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या वस्तूंची व आयएसआय मार्क वस्तूंच्या किंमतीमध्ये १० टक्के पेक्षा कमी असल्यास, १०० टक्के आदेश आयएसआय मार्क निम्नतम दरधारक उत्पादकास (L-१ of ISI) देण्यात यावेत.

४. जर आयएसआय मार्क असलेल्या उत्पादकांमध्ये पुरेशी स्पर्धा नसेल, जसे १ किंवा २ आयएसआय मार्कधारक उत्पादक असतील आणि जास्त प्रमाणात आयएसआयशी

समांतर दर्जा असलेले उत्पादक असतील, अशा परिस्थितीत जर आयएसआयशी समांतर दर्जा असलेल्या उत्पादकाचा दर हा आयएसआय मार्क उत्पादकाच्या दरापेक्षा १० टक्के जास्तीने कमी असेल तरच आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या उत्पादकाचा विचार करण्यात यावा.

अ) ६० टक्के आदेश आयएसआय मार्क निम्नतम दरधारक उत्पादकांस (L-१ of ISI) देण्यात यावेत.

ब) २० टक्के आदेश आयएसआय मार्क एल-२ उत्पादकांना (L-२ of ISI) एल-१ दराने (L-१ of ISI) देण्यात यावेत.

क) उर्वरित २० टक्के आदेश आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या निम्नतम दरधारक उत्पादकास (L-१ of confirming to ISI) देण्यात यावेत.

५. जर आयएसआय मार्क उत्पादकांनी निविदेत सहभाग घेतला नाही, तेव्हा;

अ) ६० टक्के आदेश आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या निम्नतम दरधारक उत्पादकास (L-१ of confirming to ISI) देण्यात यावेत.

ब) ४० टक्के आदेश आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या एल-२ उत्पादकास (L-२ of confirming to ISI) एल-१ दराने (L-१ of confirming to ISI) देण्यात यावेत.

६. उपरोक्त मुद्दा ४ (ब) मध्ये आयएसआय मार्क एल-२ उत्पादकाने एल-१ दराने (L-१ of ISI) पुरवठा करण्यास तयार नसल्यास;

अ) २० टक्के अधिकचा आदेश आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या निम्नतम दरधारक उत्पादकास (L-१ of confirming to ISI) देण्यात यावेत.

७. जर आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या एल-२ उत्पादकाने एल-१ दराने (L-१ of confirming to ISI) पुरवठा करण्यास तयार नसल्यास, आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या एल-३, एल-४ इ. उत्पादकांनी एल-१ दराने (L-१ of confirming to ISI) पुरवठा करण्यास तयार असल्यास, त्यांना संधी देण्यात यावी. जर निविदेतील एकही उत्पादक एल-१ दराने पुरवठा करण्यास तयार नसल्यास,

अ) उपरोक्त मुद्दा ५ (ब) मध्ये १०० टक्के आदेश आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या एल-१ उत्पादकाला (L-1 of confirming to ISI) देण्यात यावेत.

८. जर एक किंवा दोनच आयएसआय मार्क उत्पादक निविदेत सहभाग/पात्र असल्यास, व आयएसआय मार्कशी समांतर दर्जा असलेल्या उत्पादकाने कामगिरी समाधानकारक

केली असल्यास त्या पुरवठादारास पुढील वर्षात दहा टक्क्यांनी (10%) पुरवठा आदेश खरेदी समितीच्या मान्यतेने वाढवून देता येतील.

९. वर नमुद केल्याप्रमाणे आयएसआय व आयएसआय समांतर दर्जा असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादकांना एकूण खरेदीच्या 20 टक्के आदेश (परिच्छेद 5.12 मध्ये नमुद केल्यानुसार अनुसूचित जाती किंवा जमातीच्या उत्पादकांना राखून ठेवलेल्या 4 टक्के खरेदीच्या तरतुदीसह) मिळाल्यास या नियमातील परिच्छेद 5.12 मध्ये सुक्ष्म व लघु उद्योजकाकरिता वस्तू आरक्षणाबाबत जी तरतूद नमुद करण्यात आली आहे, तिची पूर्तता झाल्याचे समजण्यात येईल. तथापि, पूर्तता होत नसल्यास परिच्छेद 5.12 नुसार सुक्ष्म व लघु उद्योजकांना आरक्षण राहील.

संबंधित खरेदीदार विभागांनी/कार्यालयांनी त्यांना आवश्यक असलेल्या विर्निदेशाची (Specification) पुर्तता करणाऱ्या वस्तूंची खरेदी करणे आवश्यक असल्याने असे विर्निदेश (Specification) खरेदीदार विभागांनी त्यांच्या गरजेनुसार निश्चित करणे क्रमप्राप्त आहे.

**उत्पादने खरेदी करताना, खालील पैलू विचारात घेणे आवश्यक आहे:**

खरेदी करण्यात येत असलेल्या उत्पादनांसाठी ओ ई एम (मूळ उपकरण उत्पादक) प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. खरेदी करण्यात येत असलेल्या उत्पादनांशी संबंधित देखभालीच्या किंवा अन्य सहाय्यकारी सेवांसाठी करार - जसे सर्वसमावेशक देखभाल किंवा वार्षिक देखभाल करार, हा खरेदीच्या उत्पादना बरोबरच प्राप्त करुन घेण्यात यावा किंवा अशा सेवांच्या प्राप्तीसाठी आवश्यक तरतुद/तयारी करण्यात यावी.

### ३.१.१.२ चिन्हाकिंत नसलेल्या वस्तूंची खरेदी करताना उत्पादनाचा दर्जा तपासणी

निविदा प्रक्रिया राबविताना चिन्हाकिंत (आयएसआय मार्क) नसलेल्या उत्पादनाचा दर्जा तपासण्यासाठी मान्यता प्राप्त प्रयोगशाळांची यादी नियमपुस्तिकेच्या **परिशिष्ट १२** मध्ये देण्यात आली आहे. सदर प्रयोगशाळांच्या यादीमध्ये National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (Website-www.nabl-india.org) यांच्याकडील नोंदणीकृत/प्रमाणित असलेल्या संस्थांचा समावेश आहे. तसेच महाराष्ट्रातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून देखील वस्तूंची तपासणी करुन घेता येईल.

त्याशिवाय जिल्हयांच्या ठिकाणी आयएसआय चिन्हांकित नसलेल्या वस्तूची तपासणी करण्यासाठी तेथील खाजगी अभियांत्रिकी/इतर महाविद्यालयाने तपासणी संस्थेचा दर्जा देण्याचा प्रस्ताव विकास आयुक्त (उद्योग) यांना सादर केल्यास तो प्रस्ताव तपासून गुणवत्तेनुसार त्या अभियांत्रिकी/ इतर महाविद्यालयास तपासणी संस्थेचा दर्जा देण्याचा उचित निर्णय घेण्यात येईल. आयएसआय मार्क नसलेल्या उत्पादनाची नमुना तपासणी करण्याकरिता येणारा खर्च संबंधित निविदाधारकाकडून घेण्यात यावा.

तथापि, निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर संबंधित खरेदीदार विभागांना पुरवठादारांच्या वस्तूंचा दर्जा तपासणीसंदर्भात काही अडचण असल्यास किंवा कार्यवाही करावयाची असल्यास खरेदीदार विभागाच्या खर्चाने मध्यवर्ती भांडार खरेदीमार्फत परिशिष्ट १२ मध्ये नमुद असलेल्या प्राधिकृत प्रयोगशाळांकडून तपासणी करता येईल.

कोणत्याही तपासणी प्रयोगशाळांनी वस्तुच्या तपासणीबाबतचे चुकीचे अहवाल दिल्यास, सदर प्रयोगशाळांना संबंधीत खरेदीदार विभागांनी या नियमपुस्तिकेतील कार्यपध्दतीचा अवलंब करुन काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करावी.

## ३.१.२ किंमतीचा अंदाज आणि किंमतीचा वाजवीपणा

### ३.१.२.१ किंमतीचा अंदाज

खरेदी प्रक्रिया ही अंदाजित किंमत आणि त्यानंतर प्रत्यक्ष दयावी लागणाऱ्या किंमती भोवती फिरत असते. दरांचा/किंमतीचा अचूक अंदाज हा पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या देकारांचा वाजवीपणा निश्चित आणि स्थापित करण्यासाठी आवश्यक असतो. त्यामुळे दर/किंमत हे वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किंमतीनुसार आणि व्यावसायिक पध्दतीने काढण्यात यावेत. अंदाजित किंमत आणि प्रत्यक्ष दयावी लागणारी किंमत यामध्ये खूप मोठी तफावत असू शकणार नाही, यावर भर देण्यात यावा. खरेदीची वास्तविक किंमत व अंदाजित किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदारास विचार करता येईल. तथापि, खरेदीची अंदाजित किंमत व प्रत्यक्ष दयावी लागणारी किंमत यामध्ये जास्त तफावत असल्यास, खरेदीदार विभागाने नव्याने निविदा काढणे आवश्यक राहील. त्यानंतरही त्यामध्ये तफावत आढळल्यास, संबंधित खरेदीदार विभागाने एक उच्चस्तर प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात यावी.

खरेदीदार विभागांनी वर्षभरात लागणाऱ्या खरेदीचे नियोजन शक्यतो त्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत पुर्ण करावे. अनावश्यक खरेदी टाळण्यासाठी खरेदीदार विभागाने तिमाही किंवा सहामाही आढावा घेऊन आवश्यकेनुसार तिमाही किंवा सहामाही खरेदी करावी.

निविदांच्या बाबतीत, "निविदा अर्ज" ची किंमत ही अंदाजित खर्चाच्या आधारावर निश्चित करण्यात येते. निविदा अर्जासोबत निविदा किंमत/शुल्क व बयाना रक्कम (EMD) सोबत जोडलेल्या **परिशिष्ट ८** मधील तक्त्यांनुसार निश्चित करण्यात यावे आणि निविदाकारांकडून प्राप्त झालेले निविदा किंमत/शुल्क हे योग्य लेखा शीर्षाखाली जमा करण्यात यावे.

### ३.१.२.२ किंमतीचा आधार

खरेदी करावयाच्या वस्तूच्या किंमतीचा अंदाज खालील बाबींच्या आधारे काढण्यात यावा.

१) शेवटची खरेदी किंमत,

२) व्यावसायिक अधिका-यांने केलेले मूल्यांकन,
३) एक किंवा अधिक संभाव्य विक्रेत्यांकडून घेण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील भाव/किंमत,
४) बाजारपेठेचे सर्वेक्षण,
५) विशिष्ट खरेदीच्या प्रस्तावाच्या संदर्भात वापरण्यात आलेली अन्य कोणतीही पध्दत.

या पध्दती या परस्परांना वगळणाऱ्या नाहीत. किंमतीचा अंदाज करताना, कच्चा माल/कामगार यासंबंधीचे आर्थिक निर्देशांक, अन्य खरेदी खर्च, पॅकिंग आणि फॉरवर्डिंग खर्च, शुल्क आणि कर, अंतिम ठिकाणापर्यंत सुरक्षित वाहतुक खर्च आणि प्रशिक्षण, तपासणी इ. सारखे अन्य खर्च या बाबीं विचारात घेण्यात याव्यात. आयात करण्यात येणाऱ्या वस्तुंच्या अंदाजित किंमतीच्या संबंधात, परकीय चलनाचा विनिमय दर (परकीय चलनातील मागील माहिती, परदेशात सध्या झालेली वाढ परकीय चलनात घेण्यात यावी आणि त्यानंतर ती भारतीय रुपयात सध्याच्या पातळीवर रुपांतरित करण्यात यावी) आणि सीमा शुल्क इ. विचारात घेण्यात यावेत. संख्या आणि किंमतीसह प्रस्तावाच्या नमुन्यासाठी कृपया परिशिष्ट-१ पहावे.

### ३.१.२.३ किंमत भारतीय रुपयात काढणे

जेथे शक्य असेल तेथे, निर्धारित केलेली किंमत ही भारतीय रुपयात रुपांतरित करण्यात यावी आणि ती दोन्ही म्हणजे परकीय चलनात आणि भारतीय रुपयात, सक्षम प्राधिकाऱ्याकडून आर्थिक मान्यता मागताना सादर करण्यात यावी. विनिमय दर हा व्यापारी निविदा उघडण्याच्या दिवशी जो असेल तो स्वीकारण्यात यावा. प्रस्तावासाठी विनंती (आर एफ पी)/निविदा काढताना निविदाकारावर व्यापारी निविदा उघडण्याची दिवशी लागू असलेला रुपांतराचा दर स्वीकारण्याचे बंधनकारक करण्यात यावे.

### ३.१.२.४ कर आणि शुल्क

१. दर पत्रके/व्यापारी निविदा आमंत्रित करताना त्या इच्छित गंतव्य ठिकाणी लागू असलेले सर्व कर जसे, केंद्रीय मूल्यवर्धीत कर/महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर, इतर कर/शुल्क आणि वाहतूक खर्च इत्यादी वस्तु/सेवांच्या किंमतीपासून वेगळे दाखविण्याची त्यात सूचना करण्यात यावी.
२. परकीय निविदाकारांच्या बाबतीत: भारतामध्ये वस्तु पोहचविण्यासाठी देय असलेले सर्व कर, शुल्क, लेव्हीज आणि आकार, आगाऊ सॅम्पलसह निविदाकारांकडून चालू करारांतर्गत त्यांच्या संबंधित देशात भरण्यात येतील. तसेच भारतामध्ये भरावयाचे कर आणि शुल्क निविदाकाराकडून स्वतंत्रपणे भरण्यात येतील.

## ३.१.२.५ किंमतीचा वाजवीपणा निश्चित करणे

स्पर्धात्मक निविदेच्या प्रकरणी, जेथे दोन किंवा अधिक पुरवठादार एक करार मिळण्यासाठी स्वतंत्रपणे स्पर्धा करीत असतील तेथे, अशा स्पर्धात्मक निविदा या किंमतीचा वाजवीपणा निश्चित करण्यासाठी आधारभूत राहतील. तसेच, यापूर्वीच्या करारामधील किंमतीची सांख्यिकीय माहिती (Database), बाजारात त्या उत्पादनासाठी उपलब्ध असलेली किंमत इत्यादी बाबी किंमतीचा वाजवीपणा निश्चित करण्यासाठी वापरण्यात यावी.

(अ) उपभोक्ता/खरेदीदारांला दयाव्या लागणाऱ्या शेवटच्या खरेदी किंमतीच्या आधारे निविदांचे मूल्यांकन करण्यात यावे.

(ब) एक सर्वसाधारण तत्त्व म्हणून, कोणताही देकार ज्यामध्ये अनिश्चित किंवा अमर्यादित दायित्व किंवा कोणतीही असाधारण स्वरुपाची अट असेल, असा देकार विचारात घेण्यात येऊ नये.

(क) वस्तुच्या किंमतीबाबत बाजारातून मिळालेल्या प्रतिसादावरुन दिसून येणारी स्पर्धा, बाजारातील किंमत, शेवटची खरेदी किंमत, यापूर्वी केलेल्या करारामधील किंमतीची सांख्यिकीय माहिती (Database) च्या आधारे किंमतीचा वाजवीपणा स्थापित करता येईल.

(ड) सूटे भाग तसेच वापरामुळे संपणाऱ्या वस्तुंच्या खरेदीसाठी आणि ज्यामध्ये वस्तुंचा पुरवठा यापूर्वी करण्यात आलेला असेल असे कमी किंमतीचे करार, अशा प्रकरणी, शेवटची खरेदी किंमत आणि शासकीय सुत्रांकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या किंमतीच्या निर्देशांकांतील बदल यांच्याशी तुलना करुन किंमतीचा वाजवीपणा निश्चित करण्यात येईल.

खरेदीची पध्दत कोणतीही असली तरी शेवटची खरेदी किंमत काढण्यासाठी ई-निविदासाठीच्या संकेत-स्थळावर खरेदी केलेल्या वस्तुंच्या तपशीलवार वैशिष्ट्यांचा उपलब्ध असलेला तपशील आणि परिमाण यांचा वापर करण्यात यावा.

(इ) जेथे शेवटच्या खरेदी किंमतीमध्ये खूप तफावत असेल व ज्याबाबत किंमती निर्देशांकांतील तत्सम बदलांबाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले नसेल, अशा परिस्थितीतीत किंमतीचे विश्लेषण विचारात घेऊन किंमतीचा वाजवीपणा तपासता येईल.

(फ) किंमतीच्या विगतवारीचा तपशील आणि किंमतीचे विश्लेषण यांची तपासणी करण्यात यावी.

### ३.१.२.६ शेवटची खरेदी किंमत (एल पी पी)

किंमतीचा वाजवीपणा निश्चित करण्यासाठी महत्वाच्या घटकांपैकी शेवटची खरेदी किंमत (एलपीपी) हा एक घटक आहे आणि उद्धृत करण्यात आलेल्या देकारातील दराची शेवटची खरेदी किंमतीशी तुलना करताना खालील बाबी विचारात घेण्याची गरज असते:-

(अ) मागील तीन वर्षापेक्षा अधिक वर्षांपूर्वीची शेवटची खरेदी किंमत ही तुलनेसाठी खरे प्रमाण होत नाही. तथापि, अशी एल पी पी, त्यामध्ये दरवर्षी होणारी वाढ मिळवून, दर अजमावण्यासाठी माहिती म्हणून, आवश्यकता वाटल्यास, वापरता येऊ शकेल. वाढीचा दर हा ज्या वस्तु खरेदी करण्यात येत असतील त्या वस्तुंच्या प्रकारानुसार, प्रत्येक प्रकरणी, बदलत राहील.

(ब) एल पी पी ही पूर्वी यशस्वीरित्या पार पाडण्यात आलेल्या समान प्रमाणातील आणि समान व्याप्ती असलेल्या पुरवठा आदेशाच्या संबंधात असावी.

(क) किंमतींची तुलना करण्यासाठी एल पी पी चा एक प्रमाण म्हणून वापर करताना देकारामधील एकत्रित किंमत (बास्केट) आणि ठोक सवलत विचारात घेण्याची गरज असते.

(ड) बाजारपेठेतील परिस्थिती आणि अप्रचलित उत्पादनाचे पुन्हा उत्पादन सुरु करण्यासारखे अन्य घटक देखील विचारात घ्यावे लागतील.

(इ) जेव्हा किंमतीचा वाजवीपणा अजमावण्यासाठी कोणताही अन्य पर्याय उपलब्ध नसेल तेव्हा मागील तीन वर्षापेक्षा अधिक वर्षांची असलेली एल पी पी देखील विचारात घेता येऊ शकेल परंतु अशी परिस्थिती क्वचितच उद्भवेल.

### ३.१.२.७ परदेशी पुरवठादारांच्या किंमतीचा अंदाज करणे

परदेशी पुरवठादारांच्या किंमतीचा अंदाज करण्यासाठी खालील बाबींचे विश्लेषण करण्याचे प्रयत्न करण्यात यावेत:-

(अ) पुरवठादाराच्या देशामध्ये प्रचलित असलेली किंमत निश्चितीकरणाची कार्यपध्दती/पध्दत;

(ब) जेथे समान उत्पादने, यंत्रणा आणि उप-यंत्रणा उपलब्ध असतील तेव्हा त्यांचा संदर्भ घेण्यात यावा. अशा प्रकारच्या भांडाराच्या खरेदीशी संबंधित असलेल्या विभागाने ठेवलेल्या माहिती-संग्रहाचा उपयोग करण्यात यावा;

(क) परदेशी पुरवठादाराने अन्य खरेदीदारांना पुरविलेल्या समान उत्पादनाचा मागील तपशील आणि करारातील दर, असल्यास, ते पाठविण्याची त्याला विनंती करण्यात यावी.

(ड) खरेदीदार विभागाने परदेशी वस्तू खरेदी करताना त्याच्या किंमतीबाबतची माहिती ई-पोर्टल वरुन, त्या वस्तूचा इतर शासकीय विभागात तसेच इतर राज्यात पुरवठा झाला असल्यास, त्याची माहिती संकलित करावी. सदरची माहिती खरेदी समितीच्या निदर्शनास आणावी. माहिती उपलब्ध नसल्यास परदेशी वस्तू घेण्याची मुभा असावी. त्याअनुषंगाने सदरची वस्तू खरेदी करण्याबाबत खरेदी समिती त्यावर निर्णय घेईल.

**३.१.२.८ राज्यातील पुरवठादारांना प्राधान्य**

जेंव्हा राज्यामधील आणि राज्याबाहेरील पुरवठादारांनी निविदा प्रक्रियेत एकत्र भाग घेतला असेल, अशा वेळी उद्योजकांचा तुलनात्मक दर काढण्यात यावा. असा तुलनात्मक दर काढताना, राज्याबाहेरील पुरवठादारानी निविदेमध्ये नोंदविलेले सर्व समाविष्ट दरातून केंद्रीय मुल्यवर्धीत कर (CST) वगळून त्यामध्ये वाहतूक खर्च समाविष्ठ करुन आलेला दर व राज्यातील पुरवठादारानी निविदेमध्ये नोंदविलेले सर्व समाविष्ट दरातून महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (M-VAT) वगळून आलेला दर विचारात घेवून तूलना करण्यात यावी व निम्नतम दर ठरवावा. यापद्धतीने जर राज्याबाहेरील पुरवठादाराचा दर निम्नतम ठरला, तर राज्याबाहेरील पुरवठारास ५० टक्के पुरवठा आदेश देण्यात यावेत आणि राज्यातील उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रातील उद्योजक निम्नतम दराने समान दर्जाचा माल पुरवठा करण्यास तयार असल्यास, उर्वरित ५० टक्के पुरवठा आदेश देण्यात येतील. परंतु, राज्यामधील उद्योजक जर देकारातील निम्नतम दराने वस्तुचा पुरवठा करण्यास तयार नसेल, तर राज्याबाहेरील पुरवठादारास वस्तूचा पुरवठा करण्यासाठी संपूर्ण आदेश देण्यात यावा. आदेश विभागून देण्याचे पूर्ण अधिकार विभाग खरेदी समितीला असतील.

काही वेळा राज्याबाहेरील पुरवठादार हे महाराष्ट्र राज्यामधील पत्ता देतात. अशा प्रकरणी, जे पुरवठादार महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (व्हॅट) उद्धृत करतात, त्यांनाच फक्त राज्यामधील पुरवठादार म्हणून विचारात घेण्यात यावे.

**३.१.२.९ स्टार्ट-अप (Start-up) घटकांना प्रोत्साहन**

“केंद्र शासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालय अधिसुचना दि.१७.०२.२०१६ नुसार स्टार्ट अप घटकाची व्याख्या करण्यात आली असून त्यामध्ये खालील बाबी नमुद करण्यात आल्या आहेत.

१. घटकाची स्थापना/नोंदणी झाल्यापासून ५ वर्षांपर्यंत.

२. कोणत्याही वित्तीय वर्षातील आर्थिक उलाढाल (टर्नओव्हर) रु. २५ कोटी पेक्षा जास्त नसेल, आणि

३. जो घटक नाविण्यपूर्ण तंत्रज्ञान व बौध्दिक संपदेच्या आधारे नविन उत्पादने, प्रक्रिया किंवा सेवांचा विकास, उपयोगिता या वाणिज्यिकरण्याच्या संबंधित कार्य करीत असेल.

महाराष्ट्र राज्यात वरीलप्रमाणे स्थापित स्टार्ट-अप (Start-up) घटकांना खरेदी धोरणामध्ये प्राधान्य देण्यासाठी त्यांनी निविदेत सहभाग घेतल्यास अशा घटकास केंद्र शासनाच्या डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रीयल पॉलिसी ॲन्ड प्रमोशन (DIPP) ने ठरविलेल्या नियमावलीनुसार नोंदणी झाल्यापासून ५ वर्षापर्यंत अनुभव व वार्षिक उलाढालीच्या अटीतून सूट देण्यात येईल. तसेच, अशा घटकांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. तसेच स्टार्ट-अप (Start-up) घटकांना त्यांनी निविदेमध्ये सहभाग घेतल्यास एकूण खरेदी मूल्याच्या १० टक्के पर्यंत खरेदी आदेश प्रायोगिक तत्वावर देण्यात यावा आणि एकूण आदेश बहूविध स्टार्ट-अप (Start-up) घटकांमध्ये विभागून देण्यात यावेत. त्यानंतर अशा यशस्वी स्टार्ट-अप (Start-up) घटकांने पुढील वर्षी निविदेमध्ये सहभाग घेतल्यास एकूण खरेदी मूल्यांच्या २० टक्के खरेदी आदेश देण्यात यावेत. एका स्टार्ट-अप (Start-up) घटकाला प्रायोगिक तत्वावर देण्यात आलेला आदेश जास्तीत जास्त १० टक्केपर्यंत वाढविता येईल. सदरची सवलत खरेदी नियमपुस्तिकेत सुक्ष्म व लघु उद्योगांना प्रोत्साहनात्मक देण्यात आलेल्या तरतुदी व्यतिरिक्त राहील. मात्र त्यासाठी सदर घटकाची कामगिरी समाधानकारक असल्याची खातरजमा खरेदीदार विभागाने करावी व त्याची नोंद कार्यालयीन अभिलेखात घ्यावी.

याशिवाय, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानास चालना देण्याकरिता सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क्स, पुणे यांनी प्रमाणित केलेल्या नवीन घटकास त्यांच्या स्वयंस्फुर्तीतून निर्माण होणाऱ्या वस्तू / बाबींस उपरोक्तप्रमाणे खरेदी प्रक्रियेत ३ वर्षांपर्यंत सूट देण्यात येईल.

तसेच स्टार्ट-अप घटकांसाठी प्रस्तावित करण्यात आलेली तरतुद नाविण्यपूर्ण संगणक सॉफ्टवेअर करीता देखील लागू करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत व त्यांचे अभिप्रायानुसार संबंधित खरेदीदार विभागाने कार्यवाही करावी.

नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करुन स्टार्ट अप घटकाने उत्पादित केलेल्या वस्तूंची किंमत बाजारातील किंमतीच्या तुलनेत जास्त असू शकते. त्यामुळे अशा घटकांकडून नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादित केलेली वस्तू खरेदी करताना खरेदी नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र. ३.२.७ मधील स्विस चॅलेंज खरेदी पध्दतीचा वापर करुन देखील वस्तूची खरेदी करता येईल".

### ३.१.२.१० परदेशी घटकांची राज्यातील व परदेशातील गुंतवणूक

महाराष्ट्र राज्यात नव्याने अस्तित्वात आलेली कंपनी/घटक व नुकतेच स्थापन होऊन उत्पादन सुरु केले असल्यास किंवा थेट विदेशी गुंतवणूक (महाराष्ट्रातील स्थापित घटकांचा विदेशातील घटकामध्ये ५१ टक्के भागिदारी/हिस्सा किंवा कार्यचलनावर वर्चस्व असलेला) करुन निविदेमध्ये पात्र घटक म्हणून सहभाग केला असल्यास, तसेच अशी अस्तित्वात आलेली कंपनी जी परदेशातील सहकारी/मूळ कंपनीचे तांत्रिक सहकार्य आणि त्या परदेशी कंपनीची उपकंपनी असल्याचे कायदयाने वैध असलेली आणि अशी परदेशी कंपनी/घटक जे सर्व तांत्रिक व आर्थिक अटींची पुर्तता करत असेल (जसे सरासरी वार्षिक उलाढाल आणि इतर आर्थिक निकष), तर अशा प्रकरणी तांत्रिक व आर्थिक अटींची पुर्तता करत असलेला संयुक्त भागीदार/मूळ घटक ग्राहय धरण्यात येईल.

अशा ग्राहय कंपनी/घटकाने निविदेमध्ये सहभाग घेतल्यास त्यांचा परदेशातील मुळ कंपनी/घटकाची वार्षिक उलाढाल गृहीत धरण्यात येईल. तसेच त्यांचा परदेशातील अनुभव गृहीत धरुन अटीमध्ये सुट देण्यात येईल. परंतु सदरची मुभा ही ५ वर्षापर्यंत सिमीत राहील.

### ३.१.२.११ जतन करावयाचा माहिती संग्रह

**(अ) <u>खर्च आणि किंमतीचा माहिती-संग्रह:</u>**

विभागाने पूर्वी केलेल्या खरेदी कराराचा तपशील ज्यामध्ये खरेदी केलेली वस्तु, त्यातील महत्वाची विर्निदेश, युनिट दर, संख्या, एकूण मूल्य, खरेदी प्रकार, प्राप्त निविदाकारांची संख्या, स्वीकारार्ह म्हणून विचारात घेतलेल्या निविदांची संख्या, नजरेतून निसटल्यामुळे वगळलेल्या निविदांची कारणे, वाटाघाटी न केलेले एल-१ चे दर आणि करारामधील दर, इ. बाबींचा माहिती-संग्रह ठेवावा. त्यामुळे भविष्यातील खरेदीच्या किंमतीचा वाजवीपणा अजमावण्यास मदत होईल.

**(ब) <u>तज्ज्ञांच्या संस्था:-</u>**

बाजारपेठेतील घडामोडी, बाजारातील किंमतीचे चढ उतारातील अनुमान आणि सर्वात उत्तम प्रथा या बाबतची माहिती घेण्यासाठी तज्ज्ञ संस्थांशी संपर्क साधावा.

**(क) <u>माहितीची देवाण-घेवाण:-</u>**

विभागांनी माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी आणि माहितीचे जाळे निर्माण करण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करावी, ज्यामुळे खरेदीचे स्त्रोत विस्तारित करण्यास आणि एका वस्तुसाठी एकाच सेवेमधील किंवा वेगवेगळया सेवांमधील खरेदी

विभागांनी वेगवेगळ्या किंमती अदा करणे टाळण्यास मदत होईल. अशा प्रकारची माहिती देण्याघेण्याचे काम विभागाच्या संकेतस्थळावर/ई-निविदा पोर्टल मार्फत सुकर करण्यात येईल.

(ड) **<u>निर्धारण प्रक्रियेत पारदर्शकता:</u>**

किंमतीचा वाजवीपणा अजमावण्याचे काम हे खूप जिकीरीचे काम असते, विशेषतः जेव्हा किंमतीबाबतचा माहिती-संग्रह उपलब्ध नसतो किंवा अन्य देशांकडून खरेदी करावयाची असते, अशा प्रकरणी स्वीकारार्ह किंमत काढण्यासाठी आणि खरेदीचा निर्णय घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची नोंद करुन ठेवणे महत्वाचे असते.

## ३.२ खरेदीचे प्रकार

संबंधित अधिकारी आवश्यक वस्तुंची माहिती मिळाल्यानंतर, नमूद करण्यात आलेल्या "आवश्यकता" सर्व दृष्टीने पूर्ण झाल्या आहेत याची खात्री करुन तो खरेदीचा प्रकार निश्चित करील आणि निविदा आमंत्रित करील. आवश्यकतांचे स्वरुप व गुंतागुंत आणि खरेदी करावयाच्या वस्तुंचे मूल्य यावर आधारित, खालील खरेदीच्या पध्दती वापरण्यात याव्यात :-

१. खुली स्पर्धात्मक निविदा
२. थेट जागेवर (स्पॉट) खरेदी
३. दर पत्रकाच्या आधारे खरेदी
४. मर्यादित निविदा/निर्बंधित निविदा
५. पॅनलमधील/दर करार पुरवठादाराकडून खरेदी
६. एकल स्त्रोत खरेदी
७. स्विस चॅलेंज पद्धतीने खरेदी
८. अभिव्यक्ती स्वारस्य खरेदी पध्दती (Expression of Interest)

### ३.२.१ खुली स्पर्धात्मक निविदा

खालील परिच्छेद क्रमांक ३.२.२ ते ३.२.७ मध्ये नमूद केलेच्या खरेदींच्या पध्दतीचा वापर करण्यास भाग पाडणारी कारणे नसतील तर खरेदी कार्यालयाने नेहमी खुली निविदा/खुली स्पर्धात्मक निविदा या खरेदीच्या पध्दतीचा वापर करावा. खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया निविदा प्रकाशनाच्या पारदर्शक पध्दतीद्वारे पार पाडण्यात यावी. ज्या निविदांचे अंदाजित मूल्य रु.तीन (३.००) लाखांपेक्षा जास्त असेल, अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. ई-निविदा साठीचा तपशील परिच्छेद क्रमांक ४.१ मध्ये पहावा.

"निविदा" या शब्दाचा वापर, जेव्हा खरेदी कार्यालय त्यांच्या आवश्यकता पूर्ण तपशीलात विनिर्दिष्ट करते - जसे विशिष्ट प्रकारच्या वाहनाची किंवा फर्निचर किंवा संगणकाची खरेदी, तेव्हा करण्यात येतो. त्या अनुषंगाने पुरवठादाराची निवड ही सर्वात कमी किंमतीच्या आधारे करण्यात येते.

### ३.२.२ थेट जागेवर (स्पॉट) खरेदी

जेव्हा खरेदीची किंमत रुपये पाच हजार (रु. ५०००) पर्यंत असेल, अशा प्रत्येक प्रसंगी दरपत्रके/निविदा न मागविता थेट जागेवर खरेदी करता येईल. परंतू अशा वस्तूंची एकूण खरेदी त्या त्या आर्थिक वर्षात रुपये पन्नास हजार (रु. ५०,०००) पेक्षा जास्त नसावी.

खरेदी अधिकाऱ्यांना रुपये पन्नास हजार (रु. ५०,०००) पर्यंतची थेट खरेदी मूळ उत्पादक / अधिकृत विक्रेते/ वितरक यांच्याकडून करता येईल. मात्र या खरेदीसाठी खरेदी अधिकाऱ्याने खरेदी केलेली वस्तू मागणी केलेल्या गुणवत्तेची व सध्याच्या बाजार भावानुसार असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच खरेदी करता येईल.

खरेदी किंमतीच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत दर ५ वर्षांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आढावा घेऊन स्वतंत्र आदेश निर्गमित करेल (परिशिष्ट ९).

### ३.२.३ दरपत्रकाच्या आधारे खरेदी

जेव्हा खरेदीची किंमत रुपये पाच हजार (रु.५,०००/-) पेक्षा जास्त व रुपये तीन लाख (रु.३,००,०००/-) पर्यंत असेल तेंव्हा खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धात्मक निविदा न मागवता) करता येईल. यासाठी खरेदी किंमतीच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत दर ५ वर्षांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आढावा घेऊन स्वतंत्र आदेश निर्गमित करेल (परिशिष्ट ९). अशी दरपत्रके खुल्या बाजारातून कमीत कमी तीन वेगवेगळ्या पुरवठादार/उत्पादकांकडून तुलना करण्यासाठी मागविण्यात यावीत. दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकारांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा. यापूर्वी असे दिसून आले आहे की, खरेदी अधिकारी मोठे आदेश लहान लहान आदेशांमध्ये विभागणी करतात आणि ते त्याच विक्रेत्यांकडून दरपत्रकाच्या माध्यमातून खरेदी करतात. ही प्रथा काटेकोरपणे टाळण्यात यावी. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रुपये तीन लाखापेक्षा (रु.३,००,०००/-) जास्त नसावे.

रु. ३ लाख ते रु. १ कोटी पर्यंत खरेदीची किंमत असलेल्या ब्रॅन्डेड वस्तूची खरेदी DGS&D च्या दर करारावर देखील करता येईल. ब्रॅन्डेड वस्तूची यादी www.ipindia.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार Controller General of Patents Designs & Trademarks या केंद्र शासनाच्या विभागाकडे नोंदणी/समावेश असेल, अशी वस्तू ब्रॅन्डेड म्हणून

समजण्यात येईल. DGS & D च्या दरकरारावर उपलब्ध असलेली प्रत्येक वस्तू ब्रन्डेड वस्तू असेलच असे नाही. उदाहरणार्थ- डंगरी क्लॉथ हे कापड DGS & D च्या दरकरारावर उपलब्ध असले तरी ते ब्रॅन्डेड वस्तूंच्या यादीमध्ये ट्रेडमार्क ॲक्ट अंतर्गत समाविष्ठ नसल्याने ती ब्रॅन्डेड वस्तू ठरणार नाही.

तसेच कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु. १ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी.

अशा सर्व खरेदीचा तपशील खरेदीदार विभाग त्यांच्या संकेत-स्थळावर आणि ई-निविदेच्या पोर्टलवर प्रसिद्ध करेल.

तसेच खरेदीदार विभाग विहित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा कमी मूल्य असणाऱ्या वस्तुंची खरेदी दरपत्रकासाठी विनंती करुन खालील परिस्थितीत खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकेल:-

अ) ज्या वस्तु सहज उपलब्ध होतील आणि खरेदीदार विभागाच्या विशिष्ट तपशिलानुसार उत्पादित करण्यात येत नाहीत आणि ज्यांच्यासाठी स्थापित बाजारपेठ अस्तित्वात असेल; किंवा

ब) भौतिक सेवा ज्या खरेदी कार्यालयाच्या विशिष्ट तपशिलानुसार पुरविण्यात येत नाहीत आणि ज्या बाजारात सहज उपलब्ध असतात; किंवा

क) अशा कोणत्याही वस्तुंची खरेदी ज्यांची देखभालीसाठी किंवा आकस्मित दुरुस्तीसाठी तातडीने गरज असते.

दरपत्रकासाठी विनंतीच्या कार्यपध्दतीत खालील बाबींचा समावेश असेल:-

अ) दरपत्रके व्यवहार्य असेल तितक्या अनेक संभाव्य निविदाकारांकडून लेखी आमंत्रित करण्यात येतील;

ब) प्रत्येक निविदाकारास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल; आणि

क) यशस्वी दरपत्रक हे खरेदी कार्यालयाने दरपत्रकासाठीच्या विनंतीमध्ये नमूद केलेल्या गरजांची पूर्तता करणारे सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक असेल.

ड) दरपत्रकाच्या आधारे खरेदी करताना निविदाकाराकडून त्याचा VAT/CST क्रमांक घेण्यात यावा. तथापि, VAT/CST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील

नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकाराच्या लेटर हेडवर दरपत्रक घेण्यात यावे. अशी दरपत्रके घेताना संबंधित निविदाकाराचे पॅनकार्ड घेणे बंधनकारक राहील.

### ३.२.४ मर्यादित निविदा/निर्बंधित निविदा

ही खरेदीची पध्दत फक्त खाली नमूद केलेल्या प्रकरणी वापरण्यात यावी:-

अ) खरेदीची वस्तू, तिच्या गुंतागुंतीच्या किंवा विशेष स्वरुपामुळे, फक्त काही थोड्याच संभाव्य विक्रेत्यांकडे उपलब्ध असेल.

ब) अकल्पित घटनांमुळे निर्माण झालेल्या तातडीमुळे, खरेदी कार्यालयाचे असे मत झाले असेल की खरेदीचा विषय खुल्या स्पर्धात्मक निविदा पध्दतीचा अवलंब करुन प्राप्त करुन घेता येणार नाही.

क) जेथे शासनाने खाली नमूद केलेल्या कारणास्तव खरेदी करावयाच्या वस्तु संभाव्य निविदाकारांच्या एकाच वर्गाकडून करण्यासाठी बंधनकारक तरतूदी केलेल्या असतील अशा खालील प्रसंगी : -

   अ) देशांतर्गत उद्योगास चालना

   ब) शासनाचे सामाजिक-आर्थिक धोरण

   क) यथोचितपणे अधिसूचित केलेल्या धोरणास पुढे नेण्यासाठी सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून अन्य कोणतेही कारण.

निर्बंधित/मर्यादीत निविदेसाठीच्या प्रक्रियेत खालील बाबींचा समावेश असेल आणि खरेदी कार्यालय निविदेसाठीचे आमंत्रण थेट खालील व्यक्ती/संस्थाना पाठवू शकेल:-

एक) खरेदी कार्यालयाकडे किंवा इतर कार्यालयाकडे खरेदीच्या वस्तूंसाठी नोंदणीकृत सर्व निविदाकारांना जे खरेदीच्या वस्तू पुरवू शकतील; किंवा

दोन) परिणामकारक स्पर्धेची खात्री करण्यासाठी भेद-भावरहित पध्दतीने निवडलेल्या पुरेशा संख्येतील निविदाकारांना जे खरेदीच्या वस्तू पुरवू शकतील;

तीन) खरेदी कार्यालय सर्व संभाव्य निविदाकारांना, जे खरेदीसाठी आखून दिलेल्या अर्हता निकषांची पूर्तता करीत असतील त्यांना, निविदेसाठी आमंत्रण पाठविण्यात आलेले असेल किंवा नसेल तरी देखील, निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास परवानगी देईल;

चार) निविदाकाराबरोबर त्याच्या मागील आर्थिक वर्षातील उलाढालीपेक्षा जास्त रकमेचा करार करण्यात येऊ नये. जर यशस्वी निविकादाराकडून करावयाच्या

खरेदीची रक्कम त्याच्या मागील आर्थिक वर्षातील उलाढालीच्या रकमेपेक्षा जास्त असेल तर, अतिरिक्त पुरवठा आदेश पुढील पात्र निविदाकार, जर एल-१ दराने वस्तू पुरवठा करण्यास तयार असेल तर, करार करण्यात यावा.

अशा प्रकारची खरेदी विभागाने शक्यतो रुपये पाच कोटी (रु. ५ कोटी) मर्यादेतच करावी. जेंव्हा आदेशाचे अंदाजित मूल्य रुपये पाच कोटीपेक्षा (रु. ५ कोटी) जास्त असेल तेव्हा खरेदी अधिकाऱ्याने संबंधित विभागाच्या अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चधिकार समिती (परिच्छेद २.९.१) ची मान्यता घेऊन खरेदी करणे आवश्यक आहे.

### ३.२.५ पॅनलमधील/दर करारावरील पुरवठादाराकडून खरेदी

जर डी जी एस ॲन्ड डी, किंवा राज्य सरकार यासारख्या संस्थांकडे पॅनलवर नोंदणी केलेले पुरवठादार नसतील तरच खरेदीदार विभागाला हव्या असलेल्या वस्तुसाठी खरेदीच्या या पध्दतीचा वापर करता येईल.

जेव्हा विशिष्ट वस्तुची खरेदी पुनः पुनः करावी लागत असेल आणि अशा वस्तुंचे प्रमाण आणि आवश्यकता स्पष्ट असतील तेंव्हा पॅनल /दर करारामार्फत खरेदी करण्यात येते. ही खरेदीची पध्दत खुल्या निविदेच्या लांबलचक खरेदी प्रक्रियेला एक गतिमान आणि साधा पर्याय आहे. तथापि, पॅनलद्वारा खरेदी प्रक्रियेत अवलंब करताना योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. ही खुल्या स्पर्धात्मक निविदेच्या माध्यमातूनही पार पाडणे उचीत होईल. पॅनल पध्दतीमार्फत एकदा खरेदी केल्यानंतर, त्या नंतरच्या खरेदीसाठी प्रत्येक वेळी पुरवठादारांची पूर्व-अर्हता बघण्याची गरज नसते. पॅनलमार्फत खरेदी एका नियत कालावधीसाठी करण्यात येईल, ज्याचा मूळ खुल्या निविदेत उल्लेख केलेला असेल.

खरेदीदार विभागाने निविदा मागविताना नमुद केलेली एकूण मागणी (वस्तू, संख्या इ.) व त्यानुसार निविदाकाराने प्रत्यक्ष केलेला वस्तूचा पुरवठा (वस्तू, संख्या इ.) माहिती संबंधित विभागाने माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या मदतीने ई-निविदा पोर्टलवर वेळोवेळी प्रकाशित करावी. तसेच निश्चित केलेल्या कालावधीत मूळ मागणीपेक्षा जास्त पुरवठा होणार नाही, याची खरेदीदार विभागाने काळजी घ्यावी.

तसेच, खरेदी विभागाने/कार्यालयाने त्यांच्या मूळ प्रशासकीय विभागाला (ज्याने पॅनल तयार करणे/दर करार करण्याचे काम केले असेल) खरेदी केलेल्या वस्तुंचे परिमाण, प्रत्येक खरेदीचे मूल्य आणि पॅनल मधील विशिष्ट पुरवठादार ज्यांच्याकडून खरेदी करण्यात आली असेल, याबाबतचा तपशील कळविणे खरेदी विभागावर बंधनकारक आहे. खरेदीदार विभाग/कार्यालय त्यांनी तयार केलेल्या पॅनलच्या आधारे किती आदेश देण्यात आले त्यांचा अभिलेख ठेवण्यासाठी, ही माहिती मूळ प्रशासकीय विभागाला पाठविण्याची आवश्यकता आहे.

अशी माहिती संबंधित विभागाच्या संकेत-स्थळावर आणि विशेष करुन राज्याच्या ई-निविदेच्या पोर्टलवर प्रदर्शित करण्यात यावी.

### ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी

एकल स्त्रोत पुरवठादाराच्या निवडीमध्ये गुणवत्ता आणि खर्चाच्या संबंधात स्पर्धेमुळे जे फायदे मिळतात ते फायदे मिळत नाहीत. तसेच अशा निवडीत पारदर्शकतेची उणीव असते आणि त्यामुळे अस्वीकारार्ह प्रथांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे एकल स्त्रोत निवड पध्दत फक्त खाली नमूद केलेल्या अपवादात्मक परिस्थितीत वापरण्यात येते:-

अ) खरेदीची वस्तू फक्त एका विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा खरेदीच्या विषयाच्या संदर्भात फक्त विशिष्ट विक्रेत्याला अधिकार असतात ज्यामुळे अन्य कोणताही किंवा बदली पर्याय उपलब्ध नसतो व अन्य कोणत्याही खरेदी पध्दतीचा अवलंब करणे शक्य नसते.

ब) अनर्थकारक घटना, नैसर्गिक आपत्ती किंवा साथीच्या रोगामुळे खरेदीच्या विषयाची तातडीने गरज असते आणि खरेदीच्या अन्य कोणत्याही पध्दतीचा अवलंब करणे व्यवहार्य नसते कारण तितका वेळ थांबणे शक्य नसते.

क) वस्तु, साधने, तंत्रज्ञान किंवा सेवा एका विक्रेत्याकडून खरेदी केल्यानंतर अतिरिक्त वस्तुंचा पुरवठा देखील त्याच विक्रेत्याकडून, प्रमाणिकरणामुळे किंवा अनुरुपतेच्या कारणामुळे, खरेदी कार्यालयाच्या गरजा मूळ खरेदीच्या परिणामकारकतेमुळे भागविल्या गेल्याने तसेच, मूळ खरेदीच्या तुलनेत प्रस्तावित खरेदीचा मर्यादित लहान आकार-तुलनेने कमी प्रमाणात खरेदी, किंमतींचा वाजवीपणा आणि पर्यायी वस्तु किंवा सेवा अनुरुप नसणे, इ. बाबी विचारात घेवून, खरेदी कार्यालयाने खरेदी करण्याचा निर्णय घेणे;

ड) जेव्हा खरेदी कार्यालय खरेदीची अन्य कोणतीही पध्दत राष्ट्रीय सुरक्षतेच्या दृष्टिकोनातून उचित नसल्याचा निर्णय घेते.

इ) खरेदी कार्यालय संशोधन, प्रयोग, अभ्यास किंवा विकास या संबंधी करार करण्याचा प्रयत्न करते, ज्यामुळे खरेदी विभागावर कोणताही व्यापारी परिणाम होणार नसतो.

खरेदी प्राधिकाऱ्याने एकल स्त्रोताकडून खरेदी करण्याची गरज आणि परिस्थिती आणि या पध्दतीमुळे, अन्य पध्दतीच्या माध्यमातून खरेदी करण्यापेक्षा, होणाऱ्या फायद्यांची, लेखी नोंद करणे महत्वाचे आहे. एकल स्त्रोताकडून खरेदीच्या बाबतीत खरेदी कार्यालय अशा एकल संभाव्य निविदाकाराकडे प्रस्तावाची मागणी करेल आणि निविदाकाराबरोबर सद्हेतूने वाटाघाटी करेल. त्यानुसार, खरेदी करावयाची वस्तू एकल स्त्रोताकडून खरेदी करणे आवश्यक असल्याचे

